NR-143


**पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,**
चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे ४११ ००८
दूरध्वनी क्रमांक ०२०- २५६५७८७८ फॅक्स क्र. ०२०-२५६७४६४१
ई मेल sp.pune.r @mahapolice.gov.in
**(आस्थापना शाखा )**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रं.आशा-१/वि./प्र.ब./पोलीस अंमलदार/पोशि-सपोफौ/20525 /२०२१ पुणे, दिनांक 7/१२/२०२१.

**वाचा :- १) महाराष्ट्र पोलीस कायदा-१९५१.**
**२) जिल्हा पोलीस आस्थापना मंडळ यांचे दि. ०२/१२/२०२१ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त**

**विषय :- पोलीस अंमलदार यांची प्रशासकीय कारणास्तव बदली सन २०२१.**

*****

**आदेश :-**

महाराष्ट्र पोलीस कायदा कलम २२ न अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून जिल्हा स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ यांना अपवादात्मक प्रकरणांमध्ये जनहितार्थ आणि प्रशासनिक निकडीनुसार सक्षम प्राधिकारी म्हणून प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, पोलीस आस्थापना मंडळाने खालील नमूद पोलीस अंमलदार यांची त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे प्रशासकीय कारणास्तव बदली करण्याचा निर्णय घेतला आहे.

| अ.क्र | पोलीस अंमलदाराचे पदनाम | पोलीस अंमलदाराचे नांव | सध्याचे नेमणुकीचे ठिकाण | नवीन नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | पोशि/३८ | संजय बबन कोठावळे | इंदापूर पो.स्टे. | मुख्यालय, पुणे ग्रामीण. |

तरी, संबंधित पोलीस ठाणे / शाखा प्रभारी अधिकारी यांनी वर नमूद पोलीस अंमलदारांना त्यांच्या नवीन नियुक्तीच्या ठिकाणी जिल्हा पोलीस आस्थापना मंडळाचे निर्णयानुसार तात्काळ कार्यमुक्त करुन पूर्तता अहवाल या कार्यालयास दिनांक १३/१२/२०२१ रोजी १२.०० वा. पर्यंत सादर करावा.

सदर पोलीस अंमलदार हे बदलीचे ठिकाणी तात्काळ हजर होतील. हजर झाल्यानंतर प्रभारी अधिकारी यांनी प्रशासकीय सोयीनुसार त्यांना देय असलेला पदग्रहण अवधी देण्यात यावा. तसेच वरील नमूद पोलीस अंमलदार यांचे यापूर्वी अथवा सद्यस्थितीला गंभीर स्वरूपाची शिक्षा / गुन्हा अथवा प्राथमिक चौकशी / विभागीय चौकशी सुरु असेल, अथवा न्यायप्रविष्ठ प्रकरण चालू असेल अशा पोलीस अंमलदार यांना पोलीस ठाणे येथील महत्वाचे / गोपनीय (आर्थिक व्यवहाराबाबतचे) कार्यभार सोपविण्यांत येवू नये, याची दक्षता प्रभारी अधिकारी यांनी घ्यावी.

बदली करण्यात आलेल्या पोलीस अंमलदार यांनी पुन्हा इतरत्र बदलीबाबत विनंती अर्ज सादर करु नयेत. तसेच त्यांना आज्ञांकीत कक्ष देण्यात येणार नाही, याची समज प्रभारी अधिकारी यांनी त्यांना द्यावी.

पोलीस ठाणे / शाखा प्रभारी अधिकारी यांनी वर नमूद पोलीस अंमलदार यांना बदलीचे ठिकाणी कार्यमुक्त करतेवेळी त्यांचे ताब्यात शासकीय निवासस्थान असल्यास ते विहीत कालावधीत रिक्त करण्या बाबतची लेखी समज देण्यात यावी. त्याच प्रमाणे त्यांचे ताब्यात पोलीस मुख्यालयाकडील शासकीय मुद्देमाल साहीत्य इ. असल्यास ते जमा करुन घेण्याची कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे बदली झालेले पोलीस अंमलदार हे बदलीच्या ठिकाणी विहीत कालावधीत हजर न झाल्यास, रुग्णता रजेवर गेल्यास व परस्पर गैरहजर राहिल्यास त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही केली जाईल, याची लेखी समज संबंधित पोलीस अंमलदार यांना देण्यात यावी. राखीव पोलीस निरीक्षक, मुख्यालय यांनी मुख्यालयातून बदलून गेलेल्या पोलीस अंमलदार यांचा तसेच संबंधित प्रभारी अधिकारी यांनी त्यांचे पोलीस अंमलदार यांचा अहवाल मुदतीत सादर करावा. **बदली झालेल्या पोलीस अंमलदारांचे माहे, जानेवारी, २०२२ चे मासिक वेतन हे बदली झालेल्या नवीन पोलीस ठाणेस / शाखेस काढले जाईल, याची सर्व संबंधित प्रभारी अधिकारी यांनी नोंद घ्यावी.**

प्रभारी अधिकारी........
आवक क्र. 1154
तारीख - 9/12/2021
सायबर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण

PC / मोहोळ

बदली झालेला पोलीस अंमलदार गोपनीय / क्राईम कारकून आहे या सबबीखाली त्याला आपले अधिकारात पो. स्टे / शाखेत ठेऊन घेण्यात येऊ नये, तसे निदर्शनास आल्यास संबंधित प्रभारी अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही केली जाईल, याची सर्व प्रभारी अधिकारी यांनी नोंद घ्यावी. तसेच त्यांचेकडील बदली झालेल्या पोलीस अंमलदार यांची बदली रद्द होणेबाबत अथवा त्यास मुदतवाढ मिळणेबाबत या कार्यालयास प्रभारी अधिकाऱ्यांनी विनंती करु नये. तसेच बदली झालेले पोलीस अंमलदार बदलीचे ठिकाणी हजर न झाल्यास त्यांची नांवे या कार्यालयास कळवावीत.

कोणताही पोलीस अंमलदार बदलीवर कार्यमुक्त करण्यास राहीलेला नसलेबाबतचा अहवाल दिनांक १३/१२/२०२१ रोजी १२:०० वाजेपावेतो बिनतारी संदेश / ई-मेलद्वारे establishmentpuner@gmail.com वर कळविण्याची वैयक्तिक जबाबदारी ही पोलीस ठाणे / शाखा प्रभारी अधिकारी यांची राहील, याची नोंद घ्यावी.

06/12/21

**(जिल्हा पोलीस आस्थापना मंडळाचे मान्यतेने)** **(डॉ. अभिनव देशमुख)** भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण तथा
अध्यक्ष, जिल्हा पोलीस आस्थापना मंडळ, पुणे ग्रामीण.

प्रति,
पोलीस निरीक्षक, इंदापूर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण
प्रभारी अधिकारी, नियंत्रण कक्ष, पुणे ग्रामीण. (ई मेलद्वारे प्रसिध्दकरिता)
राखीव पोलीस निरीक्षक, मुख्यालय, पुणे ग्रामीण.
वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण.

२/- पुणे ग्रामीण जिल्हा पोलीस दलाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.

प्रत,
प्रमुख लिपीक, लेखा शाखा (२ प्रतीत) / पत्रव्यवहार शाखा.
जिल्हा पोलीस प्रसिध्दी पत्रक / आस्थापना लिपीक -८.

प्रत,
अपर पोलीस अधीक्षक, बारामती विभाग / पुणे विभाग, पुणे ग्रामीण.
पोलीस उप अधीक्षक, मुख्यालय, पुणे ग्रामीण.

प्रत माहितीस्तव सादर,

मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर.